वसई-विरार शहर महानगरपालिका

क्रीडा विभाग

दि.०६/०८/२०२६

सुब्रोतो मुखर्जी फुटबॉल स्पर्धा यशस्वीरित्या संपन्न

क्रीडा व युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य, जिल्हा क्रीडा परिषद कार्यालय पालघर व वसई विरार शहर महानगरपालिका क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'जिल्हास्तरीय शालेय व महाविद्यालयीन सुब्रोतो मुखर्जी फुटबॉल स्पर्धा' आज दि.०६ ऑगस्ट २०२६ रोजी संपन्न झाली. दि.०१ ऑगस्ट ते ०६ ऑगस्ट दरम्यान म्हाडा मैदान, अग्निशमन केंद्रासमोर, बोळींज, विरार पश्चिम येथे ही स्पर्धा खेळविण्यात आली.

वसई-विरार शहर महानगरपालिकेमार्फत या प्रतिष्ठेच्या स्पर्धेचे यंदाचे १४ वे वर्ष असून, दरवर्षीप्रमाणे यंदाही स्पर्धेला खेळाडू, प्रशिक्षक, क्रीडाप्रेमी आणि पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. महानगरपालिका क्षेत्रातील शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये फुटबॉल खेळाची आवड वाढविणे, त्यांच्यात क्रीडाभावना, शिस्त, संघभावना आणि नेतृत्वगुण विकसित करणे तसेच राज्य व राष्ट्रीय स्तरासाठी गुणवंत खेळाडू घडविणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश आहे.

यंदा या स्पर्धेमध्ये महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ८६ फुटबॉल संघांनी भाग घेतला होता. या संघांमधून तब्बल १३७६ खेळाडूंनी आपल्या कौशल्याचे प्रदर्शन केले. स्पर्धा १५ वर्षांखालील मुले, १७ वर्षांखालील मुले आणि १७ वर्षांखालील मुली अशा तीन गटांमध्ये खेळविण्यात आली. प्रत्येक गटामध्ये सहभागी संघांनी उत्कृष्ट तयारीसह मैदानात उतरून स्पर्धेचा दर्जा उंचावला. या स्पर्धेत भाग घेतलेल्या सर्व संघांतील खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत या फुटबॉल स्पर्धेत रंगत निर्माण केली. अंतीम सामनेही अतिशय अटीतटीचे झाले. १७ वर्षीय मुलांच्या गटातील अंतिम सामन्यात पेनल्टी शूट-आउटद्वारे विजेता ठरविला गेला. स्पर्धेदरम्यान पंचांनी अत्यंत निष्पक्षपणे सामने पार पाडले, तर प्रशिक्षकांनी आपल्या संघांना सातत्याने मार्गदर्शन करून खेळाडूंचा आत्मविश्वास वाढविला. मैदानावर उपस्थित क्रीडाप्रेमी, पालक आणि विद्यार्थ्यांनी खेळाडूंना दिलेल्या उत्स्फूर्त प्रोत्साहनामुळे संपूर्ण स्पर्धेत आनंददायी आणि क्रीडामय वातावरण निर्माण झाले.

या स्पर्धेत १५ वर्षाखालील मुलांच्या गटामध्ये मॅट्रीक्स ॲकॅडमी स्कूल सीबीएससी, विरार (पश्चिम) संघाने विजेतेपद पटकावले, तर १७ वर्षीय मुलांच्या गटामध्ये थॉमस बॅप्टीस्टा जुनियर कॉलेज पापडी वसई (प ) संघाने विजेतेपद पटकावले त्याचप्रमाणे १७ वर्षीय मुलींच्या गटामध्ये होली फॅमिली कॉन्व्हेंट स्कूल ॲंड ज्युनियर कॉलेज वसई वसई (पुर्व) संघाने विजेतेपद पटकावले. विजेत्या संघांना तसेच उपविजेत्या व तिसऱ्या क्रमांकांवरील संघांना व स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते चषक व मेडल्स देण्यात येऊन त्यांचा गौरव करण्यात आला. तसेच आपल्या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर निवड झालेल्या खेळाडूंना पुढील विभागीय आणि राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये पालघर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार आहे.

या स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभावेळी मा.उप-महापौर श्री.मार्शल लोपीस, मा.नगसेवक श्री.अजय रॉड्रीक्स, मा.नगरसेवक श्री.अजित भोईर, मा.नगरसेवक श्री.गणेश पाटील, मा.नगरसेवक श्री.परेश किणी, मा.नगरसेविका श्रीम.मार्शलीन चाको, मा.नगरसेविका श्रीम.सुनंदा पाटील व इतर मान्यवर तसेच उप-आयुक्त (क्रीडा) श्री.अजित मुठे, सहा.आयुक्त (क्रीडा) श्रीम.नीता कोरे, जिल्हा क्रीडा सल्लागार श्री.गोविंद शिंदे, क्रीडा स्पर्धा प्रमुख श्री.योगेश चौधरी, मनपा क्रीडा विभागाचे श्री.प्रमोद गोयल, श्री.अमित मोदी, शालेय व महाविद्यालयीन क्रीडा शिक्षक, प्रशिक्षक, खेळाडू विद्यार्थी, मान्यवर नागरिक, महानगरपालिकेचे कर्मचारी आदी उपस्थित होते.

संपूर्ण स्पर्धेचे नियोजन, व्यवस्थापन आणि आयोजन वसई-विरार शहर महानगरपालिका क्रीडा विभाग, जिल्हा क्रीडा परिषद कार्यालय, पालघर तसेच क्रीडा व युवक संचालनालय यांच्या समन्वयातून यशस्वीरित्या पार पडले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य केल्याबद्दल महानगरपालिकेचे सर्व पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, सर्व अधिकारी, कर्मचारी, पंच, प्रशिक्षक, स्वयंसेवक, शाळा-महाविद्यालयांचे मुख्याध्यापक, शिक्षक, खेळाडू आणि पालक यांचे उप-आयुक्त (क्रीडा) श्री.अजित मुठे यांचेमार्फत आभार मानण्यात आले.

सुब्रोतो मुखर्जी फुटबॉल स्पर्धा २०२६ - अंतिम निकाल

गट - १५ वर्षाखालील मुले

विजेता संघ - मॅट्रिक्स ॲकेडमी स्कूल सी बी एस सी विरार (पश्चिम),

उपविजेता संघ - होली फॅमिली कॉन्व्हेंट स्कूल वसई (पुर्व),

तृतीय क्रमांक - सेंट झेवियर्स स्कूल विरार (पश्चिम)

गट - १७ वर्षाखालील मुले

विजेता संघ - थॉमस बॅप्टीस्टा जुनियर कॉलेज पापडी वसई (प ),

उपविजेता संघ - माउंट कार्मेल स्कुल ऍन्ड जूनियर कॉलेज वसई (पश्चिम),

तृतीय क्रमांक - मुलजीभाई मेहता इंटरनॅशनल स्कूल विरार (पश्चिम)

गट - १७ वर्षाखालील मुली

विजेता संघ - होली फॅमिली कॉन्व्हेंट स्कूल अँड ज्युनियर कॉलेज वसई वसई (पुर्व),

उपविजेता संघ - आयझॅक न्यूटन ग्लोबल स्कूल सीबीएसई बोर्ड वसई (पश्चिम),

तृतीय क्रमांक - डॉन बास्को स्कुल नायगाव (पुर्व)